**जनसंपर्क अधिकारी**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३७० - २३** **दिनांक : - २३/१०/२०२३**

**गुन्हे शाखा कक्ष ०१, काशिमिरा मार्फत ७ आरोपीतांना अटक करुन एम.डी.-मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ बनविण्याची फॅक्टरी (लॅब) चा शोध घेउन त्यांचेकडून रुपये ३६,९०,७४,०००/- किं.चा (आंतराष्ट्रीय बाजारभाव प्रमाणे) १८४५३.७ ग्रॅम वजनाचा एम.डी.-मॅफेड्रॉन (त्यापैकी ५००० ग्रॅम ९० टक्के तयार झालेला), रुपये २,७३,९५०/- किं.चे एम.डी. (मॅफेड्रॉन) बनविणे उपयुक्त रसायन (द्रव्य व पावडर), रुपये २,५९,६९०/- किं.चे एम.डी. (मॅफेड्रॉन) बनविणे उपयुक्त रासायनिक साधन सामुग्री, रुपये ७,८०,०००/- किं.ची वाहने इ. तसेच २ गावठी पिस्टल (अग्नीशस्त्र), ४ मॅगझिन व १४ जिवंत काडतूस सह जप्त.**

दिनांक १८/१०/२०२३ रोजी सपोनि प्रशांत गांगुर्डे, नेमणुक गुन्हे शाखा कक्ष ०१, काशिमिरा यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, हॉटेल विन्यासा रेसीडेन्सी, बि.पी. रोड, भाईंदर पुर्व, ता.जि. ठाणे येथे काही इसम ७/८ दिवसांपासून वास्तव्यास असून त्यांचेकडे अंमली पदार्थ आहेत व ते मिरा-भाईंदर परिसरात अंमली पदार्थाची विक्री करतात तसेच त्यांचेकडे अग्नीशस्त्र असल्याची माहीती मिळाली. त्याप्रमाणे मा. वरिष्ठांचे आदेश व मार्गदर्शनाप्रमाणे कारवाई करता सनी भरत सालेकर, विशाल सतिश गोडसे, दिपक जितेंद्र दुबे व शहबाज शेवा ई यांचेताब्यातुन एकुण २५१.७ ग्रॅम एम.डी., एम.डी. विक्री करुन मिळविलेली रोख रककम, एम.डी. विक्री करीता वापरलेली एक मोटार सायकल इ. तसेच सनी सालेकर याचे ताब्यात एक गावठी पिस्टल मॅगझिन व २ जिवंत राउंडसह जप्त करण्यात येउन त्यांचेविरुध्द प्रस्तुत गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यानंतर केलेल्या तपासामध्ये आरोपीत नामे तन्वीर निसारअहमद चौधरी याचेकडून १०२ ग्रॅम एम.डी. (मॅफेड्रॉन), एम.डी. विक्री करुन मिळविलेली रोख रक्कम व एम.डी. विक्री करीता वापरलेली एक चार चाकी वाहन जप्त करण्यात येउन त्यास दिनांक २१/१०/२०२३ रोजी नमुद गुन्हयात अटक करण्यात आले. त्यानंतर आरोपीत तन्वीर निसारअहमद चौधरी याने दिलेल्या माहीतीप्रमाणे आरोपीत गौतम गुनाधर घोष याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक २१/१०/२०२३ रोजी नमुद गुन्हयात अटक करण्यात आले.

आरोपीत गौतम गुनाधर घोष याने दिलेल्या माहीतीप्रमाणे आरोपीत समीर चंद्रशेखर पिंजार याचेकडे केलेल्या तपासामध्ये सर्व्हे नं २६४/२/ए, मोखाडा, पालघर येथील जागेत आरोपीत समीर चंद्रशेखर पिंजार याने बाधलेल्या घरात एम.डी. (मॅफेड्रॉन) तयार करण्यासाठी बनविलेली लॅब मिळून आली. त्यामध्ये १८१०० ग्रॅम एम.डी. तसेच एम.डी. तयार करणेसाठी रसायन, रासायनिक उपकरणे मिळून आली. ती जप्त करण्यात येउन त्यास दिनांक २२/१०/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

तसेच आरोपीत सनी भरत सालेकर याने केलेल्या निवेदनप्रमाणे रुपये ९,६००/- किं.चे १ गावठी पिस्टल, ३ मॅगझिन व १२ जिवंत काडतुस हस्तगत करण्यात आले.

सदरची कामगीरी मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मा. श्री श्रीकांत पाठक, अतिरिक्त पोलीस आयुक्त. मा.श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त सो., गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि. कैलास टोकले, स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे, स.पो.नि.पुष्पराज सुर्वे, सफौ. राजु तांबे, संदीप शिंदे, पो.हवा.संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, सचिन सावंत, समीर यादव, पो.अं.प्रशांत विसपुते व स.फौ. संतोष चव्हाण (सायबर गुन्हे) यांनी केली असून सदर गुन्हयाचा तपास स.पो.नि. गांगुर्डे करीत आहेत.

अटक आरोपीत व त्याचा पुर्व इतिहास

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | पुर्व इतिहास |
|---|---|---|---|
| १ | सनी भरत सालेकर वय-२८ वर्षे, व्यवसाय-बेरोजगार, रा. रुम नं. ६०८ बिल्डींग नं. १ अमन आदर्श नगर, झोन मॉलच्या पाठीमागे, ॲपेक्स, हॉस्पीटल समोर, चंदावरकर लेन बोरीवली पश्चिम, मुंबई मुळ रा. सालेकर वाडी, (मुमके) ता.खेड, जिल्हा रत्नागिरी | दि.१९/१०/२०२३ रोजी | • शरीरा विरुध्द - १०<br>• मालमत्ते विरुध्द - ४<br>• मालमत्ता जाळणे - २<br>• अंमली पदार्थ - २<br><br>(सर्व गुन्हे दहीसर, एमएचबी व कस्तुरबा पोलीस ठाणे, मुंबई येथील) |
| २ | विशाल सतिश गोडसे वय-२८ वर्षे, व्यवसाय-बेरोजगार रा. रुम नं. ४ साई नगर चाळ, सेक्टर ६, कळंबोली, ता. पनवेल, जिल्हा रायगड, मुळ रा. कातरखटाव, ता.खटाव, जिल्हा सातारा. | दि.१९/१०/२०२३ रोजी | • सरकारी कामास अडथळा - १<br>• शरीर - १<br>• जबरी चोरी/किडनॅपिंक/हत्यार कायदा - १<br>• हत्यार - १<br>(सर्व गुन्हे मुंबई परिसर) |
| ३ | दिपक जितेंद्र दुबे वय- २६ वर्षे, व्यवसाय-बेरोजगार, रा. डी/४०२, गोपी कृष्णा नगर, रावलपाडा, मिनी दहीसर, दहीसर पुर्व. मुंबई मुळ रा. बेनीपुर सारनाथ, वारणसी राज्य उत्तर प्रदेश | दि.१९/१०/२०२३ रोजी | • शरीरा विरुध्द - ३<br>• आर्म्स ॲक्ट - ३<br>• अंमली पदार्थ - ३<br>(सर्व गुन्हे मुंबई परिसर) |
| ४ | शहबाज शेवा ई, वय-२९ वर्षे, व्यवसाय-बेरोजगार , रा. रुम नं. ४०४, बिल्डींग नं. १३/१५, सुर्यदर्शन बिल्डींग, आनंद नगर, दहीसर पुर्व मुंबई. | दि.१९/१०/२०२३ रोजी | शरीरा विरुध्द - १<br>अंमली पदार्थ - २<br><br>(मिरारोड, नवघर व नयानगर) |
| ५ | तन्वीर नासीरअहमद चौधरी वय ३३ वर्षे, व्यवसाय ईव्हेन्ट ऑर्गनायझेशन, रा. ए/७०२, न्यु लवलेश एन्क्लेव्ह, गोल्डननेस्ट, भाईंदर पुर्व ता.जि. ठाणे ४०११०७. | दि. २१/१०/२०२३ | शरीरा विरुध्द - २<br>अंमली पदार्थ - २<br><br>(दहीसर पोलीस ठाणे, मुंबई) |
| ६ | गौतम गुनाधर घोष वय ३८ वर्षे, व्यवसाय व्यापार, रा. ए/१०२, आनंद एन्क्लेव्ह, आर.बी.के.ग्लोबल स्कुल समोर, इंद्रलोक फेज ६, भाईंदर पुर्व ता. जि. ठाणे ४०११०५ मोबा.नं. ९८६७४९००१२. | दि. २१/१०/२०२३ | सरकारी कामात अडथळा - १<br><br>(नवघर पोलीस ठाणे, मि.भा.व.वि.) |
| ७ | समीर चंद्रशेखर पिंजार . वय-४५ वर्षे, व्यवसाय सिव्हील कॉन्ट्रॅक्टर, रा. ए/२०२, नादब्रम्हा अपार्टमेंट भास्कर आळी, वसई, ता. वसई जिल्हा पालघर | दि. २२/१०/२०२३ | शरीरा विरुध्द -<br>मालमत्ते विरुध्द - |



-



----ooo-----